हौसेनी जमवलेल्या वस्तू आलेल्या पाहुण्यांना कशा दिसतील याकडे अनेकांचा कल असतो आणि ते करताना भारंभार वस्तूंनी सजवलेला हा लिव्हिंग एरिया घरातील बैठकीची खोली न वाटता एखाद्या शोरूमचा भाग जास्त वाटतो...

# माय लिव्हिंग!



## मिती आणि निर्मिती



• केतन गाडगीळ

आमच्या घराचं इंटिरियर करताना बजेट जरा थोडंफार वाढलं ना तर आपण किचन किंवा बेडरूममध्ये थोडं कमी काम करून घेऊ पण लिव्हिंग मात्र अगदी छान, सगळ्यांपेक्षा वेगळं झालं पाहिजे. मग त्यासाठी बजेटही थोडं वाढलं तरी चालेल' अशाप्रकारच्या प्रतिक्रिया लिव्हिंगचं काम करत असताना कायमच ऐकायला मिळतात. प्रत्येकालाच आपली लिव्हिंग रूम नेटकी असावी, छान दिसावी असं वाटत असतं आणि ते अगदी साहजिक आहे. कारण घरात येताच प्रथमदर्शनी असणारी ही बैठकीची जागा किंवा हॉल तिच्या रंगरूपावरून त्या घरातल्यांच्या आवडीविषयी, व्यक्तिमत्त्वाविषयी बरंच काही सांगून जाते.

घरातल्या इतर खोल्यांना जोडणारी, इतर खोल्यांच्या तुलनेत आकाराने मोठी असलेली, मोकळी ढाकळी अशी ही बैठकीची खोली म्हणजेच सध्याची 'लिव्हिंग'.

'लिव्हिंग रूम'चं डिझाइन करत असताना त्यामध्ये समाविष्ट करण्याच्या गोष्टींचा विचार करून, त्यांची मांडणी कशी असावी याचा लेआऊट आधी पक्का करावा लागतो. लिव्हिंगमधील रचना कायमस्वरूपी असावी का थोडा चेंज म्हणून बदलता येणारी हवी हे मात्र आधी ठरवणं अगदी गरजेचं असतं आणि ही रचना करत असताना लिव्हिंगमधून दिसणारा कुठला 'व्ह्यू' ब्लॉक होणार नाही याची मात्र काळजी घ्यायला हवी.

लहान आकाराच्या घरांचा विचार केला तर त्या ठिकाणी डाइनिंगसाठी मिळणारी जागा किंवा लिव्हिंगला जोडून असणारी बाल्कनी किंवा टेरेसची जागा चांगल्या पद्धतीने जोडली तर आपल्याला एक्स्टेंडेड लिव्हिंग एरिया मिळू शकतो. या एक्स्टेंडेड जागेबरोबरच बसण्यासाठीसुद्धा वापरता येणारी लो लेव्हल बे विंडो ही लिव्हिंगसाठी वापरल्यास बैठकीची जागाही वाढतेच. पण त्याबरोबर फ्लोअर स्पेस ही बरीच रिकामी राहू शकते.

जागेची कमतरता नसलेल्या घरामध्ये तर लिव्हिंगमध्ये 'फॉर्मल' आणि 'इनफॉर्मल' अशा दोन प्रकारच्या बैठकीची व्यवस्था करता येऊ शकते.

लिव्हिंगमध्ये केलेला वेगवेगळ्या लेव्हलचा वापर लिव्हिंगला एक वेगळाच लुक देऊन जातो. पण काही घरगुती समारंभांसाठी अथवा एखाद्या फॅमिली गॅदरिंगसाठी लागणारी एकाच लेव्हलवरची सलग सरळ जागा वापरण्याच्यादृष्टीने गैरसोयीचीही ठरू शकते.

बरेचदा अनेक फ्लॅट्समध्ये इतर खोल्यांना जोडणारा पॅसेज लिव्हिंग एरिया चक्क दोन भागातच डिव्हाइड करतो आणि त्यामुळे लिव्हिंगमध्ये एकत्र बसण्याचा उद्देशच संपुष्टात येतो.

बंगलेवजा घरामध्ये फ्लॅटच्या तुलनेत जास्त उंची या लिव्हिंगसाठी घेता येऊ शकते. लिव्हिंगला दिलेली डबल हाइट एक ग्रँड लुक तर देतेच त्याबरोबरच हवाही मोकळी, खेळती राहण्याच्या दृष्टीने उपयोगी पडते. या डबल हाइट लिव्हिंगची स्वच्छता करण्याकरताही बरेच खटाटोप करावे लागतात. पण 'लिव्हिंगच्या लुकसाठी कुछभी' म्हणणारे हाही खटाटोप आनंदाने करतात.

लिव्हिंगच्या लेआऊटमध्ये बैठक व्यवस्थेबरोबर 'टीव्ही युनिट' हाही प्रत्येक घरात दिसणारा एक अविभाज्य घटक आहे. खरं तर लिव्हिंगमध्ये सगळ्यांनी एकत्र बसून निवांतपणे गप्पागोष्टी करत असताना टीव्ही हा एक अडथळाच वाटू लागतो. त्यामुळे हल्ली बरेच ठिकाणी 'फॅमिली रूम' करता वेगळी जागा निर्माण करून त्याठिकाणी टीव्हीबरोबरच इतर एंटरटेन्मेन्टच्या गोष्टींची सोय केलेली दिसते.

लिव्हिंग एरियामध्ये डिस्प्ले युनिट्स करून त्यामध्ये हौसेनी जमवलेल्या वस्तू आलेल्या पाहुण्यांना कशा दिसतील याकडे अनेकांचा कल असतो आणि ते करताना भारंभार वस्तूंनी सजवलेला हा लिव्हिंग एरिया घरातील बैठकीची खोली न वाटता एखाद्या शोरूमचा भाग जास्त वाटतो. त्यामुळे सीलिंग अॅरेंजमेंट एखादं बुक शेल्फ, छोटंसं डिस्प्ले युनिट, सेंटर टेबल आणि आवश्यक वाटल्यास टीव्ही युनिट या गोष्टींची मांडणी करताना भिंतीवरच्या जागेचा कमीत कमी वापर करून, भिंती रिकाम्या ठेवल्यास खोली आपोआप मोकळी आणि प्रशस्त वाटते.



एखाद्या विशिष्ट प्रकारचे फर्निचर, एखादी थीम ठरवून त्यानुसार केलेली मांडणी, रंगाचा वापर, लाइटची अॅरेंजमेंट लिव्हिंगचे वेगळेपण जपण्यासाठी नक्कीच उपयोगी ठरू शकते.

पण प्रत्येकालाच आपलं घर किंवा लिव्हिंग हे एखाद्या थीमवर डिझाइन करून घेणं शक्य होत नाही. अशावेळी कमीत कमी वस्तूंची केलेली मांडणी, एखाद्या भिंतीवर केलेला वेगळ्या रंगाचा वापर किंवा अगदी पडदे, सोफा यासाठी वापरलेल्या वेगळ्या प्रकारच्या चांगल्या कापडाच्या वापरामुळेसुद्धा लिव्हिंगचं वेगळेपण जपता येतं.